विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# २५ सप्टेंबरपासून जालना जिल्ह्यात खतासाठी FFS प्रणाली

## मोबाईलवरून खताचे बुकिंग; शेतकऱ्यांना कोड व टोकन नंबर मिळणार
## जमीन व पिकाच्या क्षेत्रानुसार ॲपमध्ये खताची शिफारस; तीन दिवसांत करावी लागणार खरेदी

**जालना । प्रतिनिधी**

केंद्र शासनाकडून अनुदानित रासायनिक खतांची विक्री सध्या ई-पॉस मशीनद्वारे कृषी सेवा केंद्रांमार्फत केली जाते. या प्रक्रियेत शेतकऱ्यांना खताची खरेदी अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलदगतीने करता यावी, यासाठी केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने () ही मोबाईल आधारित प्रणाली विकसित केली आहे. महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येत असलेली ही प्रणाली आता २५ सप्टेंबर २०२६ पासून जालना जिल्ह्यासह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये लागू होणार आहे.

प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईलवरून खताची आवश्यकता नोंदविता येणार आहे. शेतजमिनीचे क्षेत्रफळ आणि निवडलेल्या पिकाच्या आधारे ॲपमध्ये () अर्थात सामान्य खत शिफारस उपलब्ध होणार आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना आवश्यक खताचा प्रकार आणि गोण्यांची संख्या निवडता येणार असून, जवळील उपलब्ध खत विक्रेत्याची निवड करून आणि मिळविता येणार आहे.

**असल्यास प्रक्रिया सोपी**

शेतकऱ्याकडे उपलब्ध असल्यास ॲपमध्ये राज्याची निवड करून आणि आधारशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या च्या माध्यमातून लॉगिन करता येणार आहे. त्यानंतर संबंधित शेतकऱ्याची जमीनविषयक माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होऊ शकते. उपलब्ध नसलेल्या शेतकऱ्यांनाही आधार क्रमांकाच्या माध्यमातून अर्ज करता येणार आहे. मात्र, त्यासाठी आधारशी मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक आहे. जमीन मालकी अथवा जमीन कसणाऱ्याची श्रेणी निवडल्यानंतर सर्व्हे क्रमांक, गाव, जिल्हा आणि हेक्टरमधील क्षेत्रफळाची माहिती भरावी लागणार आहे. जमीनविषयक माहितीची पडताळणी करून ती सबमिट केल्यानंतर पीक निवडता येणार आहे.

पिकानुसार खताची मात्रा ॲपमध्येच शेतकऱ्याने निवडलेल्या पिकाचे आणि जमिनीच्या क्षेत्रफळाचे विवरण लक्षात घेऊन ॲपमध्ये उपलब्ध होईल. त्यानुसार आवश्यक खताचा प्रकार व गोण्यांची संख्या निवडता येणार आहे. त्यानंतर उपलब्ध साठ्यानुसार खत विक्रेत्याची निवड करावी लागेल. वेगवेगळी खते वेगवेगळ्या दुकानांमध्ये उपलब्ध असल्यास एकापेक्षा अधिक विक्रेते निवडण्याची सुविधाही एफएफएस प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. अर्ज सबमिट केल्यानंतर शेतकऱ्याला आणि मिळेल. हा मोबाईलमध्ये जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

निवडलेल्या विक्रेत्याच्या दुकानात जाऊन दाखवल्यानंतर खताची खरेदी करता येणार आहे. कोड मिळाल्यानंतर तीन दिवसांची मुदत

खताची बुकिंग केल्यानंतर प्राप्त झालेला किंवा तीन दिवसांसाठी वैध राहणार आहे. या कालावधीत संबंधित शेतकऱ्याला निवडलेल्या (पान २ वर)

# गणेश मंडळाच्या माध्यमातून; शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

### माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर ‘लोकसंवाद-२०२६’ हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा ‘लोकसंवाद-२०२६’चा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

**विविध विभागांच्या योजनांची माहिती**

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये ‘लोकसंवाद’ कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

‘लोकसंवाद-२०२६’मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांचा सहभाग असणार आहे. शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती योजना सवलती यासह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. कौशल्य विकास क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांच्या योजनांबाबत युवक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, आणि आपले सरकार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती करण्यात येणार आहे.

**आंतरविभागीय समन्वयावर भर**

‘लोकसंवाद-२०२६’ प्रभावीपणे राबविण्यासाठी (पान २ वर)

# कलश शिष्यवृत्ती योजनेला ५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

कलश सीड्स फाउंडेशनतर्फे जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी एकूण १८ व्यावसायिक कोर्सेससाठी राबविण्यात येत असलेल्या कलश सीड्स शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

१५ सप्टेंबर ही अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख होती. मात्र, बहुतांश कोर्सची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने कुणीही विद्यार्थी योजनेपासून वंचित राहू नये म्हणून अर्ज सादर करण्यासाठी ५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. एमबीबीएस, इंजीनियरिंग, एम.टेक. आयसीटी जालना, सीए/सीएस/आयसीडब्ल्यूए फाउंडेशन, सीए/सीएस/आयसीडब्ल्यूए प्रथम आणि द्वितीय वर्ष, एलएलबी (पाच वर्षाचा एकत्रित अभ्यासक्रम), बी.फार्मसी, बी.एस्सी. (पान २ वर)

# गणेशोत्सवाचा वारसा आता जागतिक डिजिटल संग्रहात

## bappa.org वर अनुभव, परंपरा आणि आरती शेअर करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा, भक्ती, संस्कृती आणि लोकजीवनाचा वारसा जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत ‘.’ हे डिजिटल व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. गणेशभक्तांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या बाप्पाशी संबंधित आठवणी, परंपरा, पाककृती आणि आरतीचा ठेवा डिजिटल स्वरूपात जतन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




या उपक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सवाशी संबंधित विविध प्रकारची माहिती एका जागतिक डिजिटल संग्रहात संकलित केली जात आहे. नागरिकांना आपल्या जालना जिल्ह्यातील गणेशोत्सवातील अनुभव आणि आठवणी शेअर करण्याबरोबरच घरगुती किंवा सार्वजनिक गणेश मंडळातील आरती रेकॉर्ड करून अपलोड करण्याची संधी मिळणार आहे. तसेच आपल्या गणरायाचे छायाचित्रही या संग्रहात सहभागी करून घेता येणार आहे.

यासाठी नागरिकांनी ‘.’ या संकेतस्थळाला भेट देऊन ‘माहिती’ या पर्यायातून ‘तुमची कथा सांगा’ या विभागात प्रवेश करावा. येथे कथा, पाककृती, परंपरा आणि थेट आरती असे चार पर्याय उपलब्ध आहेत. त्यापैकी आवश्यक पर्याय निवडून संबंधित माहिती भरावी. मोबाईलचे लोकेशन बंद असल्यास पिनकोड क्रमांक नोंदवावा.

‘.’ या संकेतस्थळावर गणपती बाप्पाच्या प्रसिध्द आरत्या व भक्तिगीते, गणेशोत्सवाच्या विविध परंपरा आणि नागरिकांचे अनुभव यांचा डिजिटल संग्रह उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची सांस्कृतिक ओळख आणि लोकपरंपरा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्यास मदत होणार आहे. गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या घरातील, परिसरातील आणि मंडळातील गणेशोत्सवाच्या परंपरा ‘.’ या संकेतस्थळाच्या माध्यमातून जगासमोर आणाव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# नंदापूरच्या वैभवात भर पडणार; भव्य भारत माता मंदिराचा २८ सप्टेंबरला लोकार्पण सोहळा

## ह. भ. प. डॉ. भगवानबाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून मंदिराची उभारणी ; समृद्धी महामार्गालगत नंदापूरला नवी ओळख

**जालना - प्रतिनिधी**

द्राक्ष उत्पादनासाठी एकेकाळी जिल्ह्यात अग्रगण्य असलेल्या नंदापूर गावाच्या वैभवात आता आणखी एका महत्त्वपूर्ण वास्तूची भर पडली आहे. गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या भव्य भारत माता मंदिराचा लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ३.४५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.




या भव्य-दिव्य भारत माता मंदिरामुळे नंदापूर गावाची एक वेगळी ओळख निर्माण होत असून, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचा संदेश देणारे हे मंदिर परिसराचे आकर्षण ठरणार आहे. मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैयुजी जोशी तसेच जालना येथील उद्योजक घनशामजी गोयल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नंदापूर हे गाव द्राक्ष उत्पादनासाठी विशेष ओळखले जाते. येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर द्राक्षाचे उत्पादन घेत असून, कृषी क्षेत्रात गावाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यातच आता भारत माता मंदिराची भव्य वास्तू उभी राहत असल्याने नंदापूरच्या ओळखीत आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. विशेष म्हणजे भारत माता मंदिर हे समृद्धी महामार्गापासून अवघ्या दोन मिनिटांच्या अंतरावर असल्याने महामार्गावरून प्रवास करणाऱ्या (पान २ वर)

# गौरी आगमनाच्या तयारीला वेग; जालना बाजारपेठेत सजावटीच्या साहित्याची खरेदी जोरात

## मुखवटे, दागिने अन् आकर्षक सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठ सजली

**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या उत्साहात आता गौरी आगमनाची लगबग सुरू झाली आहे. जालना शहरातील मुख्य बाजारपेठेत गौरीच्या स्वागतासाठी विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध झाले असून, आकर्षक गौरी मुखवटे, दागिने, वस्त्रालंकार, फुलांच्या माळा, तोरणे, सजावटीच्या वस्तू तसेच पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीला वेग आला आहे. १७ सप्टेंबर रोजी गौरीचे आगमन होणार असल्याने बाजारपेठेत महिलांची विशेष गर्दी पाहायला मिळत आहे.





गणरायाच्या आगमनानंतर घराघरांत आता गौरीच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. गौरीची स्थापना ज्या पद्धतीने केली जाते, त्यानुसार घरातील सजावटीला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे बाजारपेठेत पारंपरिक तसेच आधुनिक पद्धतीच्या सजावटीच्या वस्तूंना मागणी वाढली आहे. मुख्य बाजारपेठेतील विविध दुकानांमध्ये विविध आकारांचे आणि आकर्षक कलाकुसरीचे गौरी मुखवटे उपलब्ध झाले आहेत. काही मुखवट्यांवर पारंपरिक दागिन्यांची सजावट करण्यात आली असून, काही मुखवटे अधिक आकर्षक रंगसंगती आणि नक्षीकामामुळे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. आपल्या घरातील गौरीची सजावट अधिक देखणी दिसावी यासाठी महिला आवर्जून मुखवटे, साड्या, दागिने आणि इतर पूजासाहित्याची निवड करताना दिसत आहेत. यासोबतच गौरीसाठी लागणारे तोरण, कृत्रिम फुले, हार, रांगोळी साहित्य, सजावटीचे पडदे, आकर्षक दिवे आणि विविध शोभेच्या वस्तूंचीही खरेदी सुरू आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठ पुन्हा एकदा गजबजली आहे. गौरी आगमनासाठी अवघे काही दिवस शिल्लक असल्याने पुढील दोन दिवसांत खरेदीसाठी गर्दी आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः महिलांकडून गौरीच्या सजावटीसाठी पारंपरिक आणि आकर्षक (पान २ वर)

# जे ई एस महाविद्यालयात राष्ट्रीय पोषण सप्ताह




**जालना - प्रतिनिधी**

येथील जे ई एस महाविद्यालयाच्या गृह शास्त्र विभागात राष्ट्रीय पोषण सप्ताह निमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले.

प्रा.डॉ.सुषमा दिपवाल यांनी पोषण,संतुलित आहार, आरोग्यदायी जीवनशैली, विविध पोषक घटकांचे महत्व,दैनंदिन आहाराबाबत जागृतता आदी विषयांवर भाष्य केले. यावेळी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. उमेश मोगले, रजिस्ट्रार बाबाजी सोळुंके, सचिन निसर्गन यांची प्रमुख उपस्थिती होती. गरिमा गोस्वामी, प्रियंका लौखरे, आम्रपाली सोनकांबळे, मनीषा खंडाळे,नेहा कसबे,पूजा गवई,कल्याणी गवई आदी गृह विज्ञान विभागाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# संपादकीय...

## दणदणाट हरला, संस्कृती जिंकली जालनेकरांनो, हा आदर्श पुढे घेऊन चला!

गणपती बाप्पा म्हणजे आनंद. बाप्पा म्हणजे भक्ती. बाप्पा म्हणजे संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा. मग या मंगलमय उत्सवाला कानठळ्या बसवणाऱ्या डीजेच्या दणदणाटाची गरज तरी का? हा प्रश्न यंदा जालना शहरातील गणेश भक्तांनी आपल्या कृतीतूनच विचारला आणि त्याचे उत्तरही दिलेडीजेविना गणेशोत्सव होऊ शकतो आणि तो अधिक सुंदरपणे होऊ शकतो! यंदा जालनेकरांनी डीजे बंदीचे पालन केले, ही केवळ प्रशासनाच्या आदेशाची अंमलबजावणी नाही; हा नागरिकांच्या सामाजिक भानाचा विजय आहे. गणेश आगमनाच्या मिरवणुका निघाल्या, हजारो भक्त सहभागी झाले, ढोल-ताशांचा निनाद झाला, लेझीमचा ताल रंगला, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष झाला; पण कान फोडणारा डीजे नव्हता. आणि तरीही उत्साह कमी झाला नाही. उलट भक्ती अधिक जाणवली. म्हणूनच जालनेकरांचे अभिनंदनगेल्या काही वर्षांत एक विचित्र समीकरण तयार झालेमोठा डीजे म्हणजे मोठा उत्सव! मोठे स्पीकर, प्रचंड आवाज आणि त्यावर नाचणारी गर्दी म्हणजे गणेशोत्सवाची भव्यता, असा गैरसमज समाजात रुजवला गेला. आता हा गैरसमज मोडण्याची वेळ आली आहे. रुग्णालयाजवळील रुग्ण असो, परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी असो, वृद्ध नागरिक असो किंवा घरात लहान मूल असोत्यांच्या शांततेचा अधिकार काय कमी आहे? आपला आनंद दुसऱ्याच्या त्रासावर उभा असेल, तर तो उत्सव कसला? हा प्रश्न प्रत्येक गणेश मंडळाने स्वतःला विचारला पाहिजे. डीजे बंदीचे पालन झाले म्हणून पोलिसांचे अभिनंदन करणे सोपे आहे. प्रशासनाने नियम केले, यंत्रणा तैनात केली आणि कारवाईचा इशारा दिला, हे आवश्यकच. पण त्यापेक्षा मोठी गोष्ट म्हणजे नागरिकांनी स्वतःहून संयम दाखवणे. कायद्याची भीती वाटून नियम पाळणारा समाज आणि सामाजिक जबाबदारी म्हणून नियम पाळणारा समाज यातील फरक मोठा आहे. जालनेकरांनी यंदा दुसऱ्या प्रकारची प्रगल्भता दाखवली, असे म्हणण्यास हरकत नाही. गोवत्स के गणराज गणेश मंडळाने सजवलेल्या बैलगाडीतून बाप्पाचे आगमन करून आणखी एक वेगळा आदर्श ठेवला. ना अनाठायी भपका, ना डीजेचा दणदणाट; त्याऐवजी पारंपरिक पद्धतीने गणरायाचे स्वागत. 'मूर्ती छोटी, उत्सव मोठा' हे मंडळाचे ब्रीद आजच्या काळाला आरसा दाखवणारे आहे. मूर्ती किती फूट उंच आहे, यापेक्षा भक्ती किती खोल आहे, हे महत्त्वाचे. स्पीकर किती मोठा आहे, यापेक्षा 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष किती मनापासून आहे, हे महत्त्वाचे. यंदा डीजे बंदीचे पालन झाले म्हणून प्रशासनानेही समाधान मानून चालणार नाही. ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान झाली पाहिजे. गणेशोत्सव असो, धार्मिक मिरवणूक असो, राजकीय कार्यक्रम असो किंवा अन्य कोणताही सार्वजनिक कार्यक्रमनियम एकच असला पाहिजे. 'आपला माणूस' म्हणून आवाजाची मर्यादा बदलणार असेल तर बंदीचा अर्थच उरत नाही. कायद्याला चेहरा नसतो; तो सर्वांसाठी समान असतो. प्रशासनाने ही कसोटी पुढेही पाळली पाहिजे. यंदा जालना शहराने एक प्रयोग केला आहे. डीजे नसेल तर उत्सव फिका पडत नाही, हे सिद्ध झाले आहे. आता पुढची पायरी अधिक मोठी असली पाहिजे. डीजेविना मिरवणूकहोऊ शकते. ध्वनिप्रदूषणाविना उत्सवहोऊ शकतो. परंपरेतून जल्लोषहोऊ शकतो. भक्तीतून भव्यतानक्कीच होऊ शकते! म्हणूनच यंदाच्या गणेशोत्सवात डीजेचा आवाज कमी झाला असेल, तर त्याला उत्सवाची मर्यादा समजू नका; तो समाजाच्या विवेकाचा वाढलेला आवाज समजा. जालनेकरांनी दाखवून दिले आहे. गणरायाला कानठळ्या बसवणारा आवाज नको; मनाला भिडणारी भक्ती हवी! आता प्रशासनानेही ठरवावे. नियम फक्त कागदावर राहणार की प्रत्यक्षातही समानपणे लागू होणार? आणि गणेश मंडळांनीही ठरवावे. आपण बाप्पाचा उत्सव साजरा करणार आहोत की स्पीकरचा? यंदा जालना शहराने उत्तर दिले आहे. बाप्पाचा! दणदणाट हरला... संस्कृती जिंकली!

## गणरायाचे उत्साहात स्वागत घरोघरी बाप्पा विराजमान

**परतुर - प्रतिनिधी**

परतुर : शहरात गणपति बप्पा मोरया ... मंगलमूर्ति मोरया गगनभेदी जयघोष, ढोल -ताशांता गजर , मुलांची . गुलालांची उधळण आशा उत्साही व जल्लोष पुर्ण वातावरणात सोमवारी भाविकांनी आपल्या लाडक्या गणरायाचे सहवाग केले . गणरायाच्या जयघोषाने परतुर शहरात व मोंढा भागात,ते तहेयसिल परिसर हाजरत मानिक जी मस्तांन चौक ते मंलगशाहा चौक, भाजी मंडी , चौक मस्जिद ते, नारायण दादा चौक , सोमानी गल्ली, देशपांडे गल्ली, येथुन ते, राम गल्ली, ते पठानपुरा मार्ग ते राजपूत गल्ली, ते, जुना पोस्ट ऑफिस रोड, संपुर्ण शहर परिसर दुमदुमन गेला होता . गणेश मंडळांनी वाजत - गाजत मिरवणुका काढल्या .घरोघरी दुपारपयंत मोठ्या भक्तिभावाने बाप्पाची प्राण-प्रतिष्ठापना करण्यात आली ; तसेच मोठ्या गणेश मंडळात सांयकाळी श्रीची पुजा अर्चा करुण प्रतिष्ठिपना झाली .

गणरायाच्या स्वागतासाठी भक्ताची गेल्या काही दिवसापासुन मोठी लगबग सुरु होती . या निमित्ताने गेल्या दिवसापासुन बाजारात भाविकांची रेलचेल वाढली होती . सोमवारी परतुर शहरात सकाळ पासुनच गणेशमुर्ती घेण्यासाठी श्री मोंढा भागात गणेश भक्तांची तोबा गर्दी होती . अनेक जण सहकुठुंब मित्र परिवारासह गणेशमुर्ती खरेदीसाठी आले होते . लाहाण मुंलांमध्ये मोठा उत्साह दिसुन आला . परतुरकरांच्या जल्लोषात स्वागत गणपति बाप्पा मोरिया... मंगलमूर्ति मोरया ... च्या जयघोषात बॅडबाजासह ढोल -ताशांताच्या। गजरात वाचात नाचात गुलालांची उधळण करुण शहरवासियानी अत्यंत उत्साह ने जल्लोषात श्री गणरायाचे स्वागत केले . एक, दोन, तीन, चार, गणपतिचा जय-जय कार आणी गणपती बप्पा मोरया आसा जयघोषाने संपुर्ण शहर दुमदुमले होते . घरोघरी सकाळपासुनच श्रीच्या प्रतिष्ठपनेची लगबग सुरु होती.

# निसर्गकवी ना. धो. महानोर!

मराठी साहित्यातील अनमोल रत्न, निसर्गकवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना. धो. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेडे येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आई-वडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असत. ना. धो. महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. त्यात ते सर्वांत थोरले होते.

त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले; मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा-बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करू लागले. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार आणि निसर्ग यांची आवड होती. त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली.

मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगावला उच्च शिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्यप्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्यप्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले, पण कविता थांबली नाही.

ते शेतशिवारात रमून कविता करू लागले. शेतशिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अद्भुत निसर्गकवितांनी त्यातल्या रंग-गंधांनी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद-लयींनी वाचक-रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना. धो. महानोर सरांच्या कवितेचे केंद्रस्थान निसर्ग आणि स्त्रिया होते. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या.

त्यांचे एकूण अकरा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून 'अजिंठा' नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्यलेखनही सुरू ठेवले. 'गांधारी' ही कादंबरी, 'गपसप' व 'गावाकडच्या गोष्टी' हे लोककथासंग्रह, 'यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार', 'शरद पवार आणि मी', 'आनंदयोगी पु. ल.' ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्यलेखन विपुल प्रमाणात केले असले, तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होते.

त्यांनी अनेक चित्रपटांची गाणीही लिहिली आहेत. 'जैत रे जैत' चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठांवर आजही कायम आहेत. ना. धो. महानोर सर सहा वर्षे विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केला.

महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले. अगदी पद्मश्रीदेखील मिळाली; मात्र 'निसर्गकवी' ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्गकवी सर्वांना सोडून गेला. ना. धो. महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले, तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्गकवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्गकवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.
निसर्गकवी ना. धो. महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार दौंड,**
**जिल्हा-पुणे**

# गणरायाचे थाटात आगमन; गणपती बाप्पा मोरयाचा गजर..!

**जाफराबाद - प्रतिनिधी**

जाफराबाद शहरासह तालुक्यात गणेशोत्सवाला मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. 'गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया...'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी, आकर्षक सजावट आणि भक्तांच्या उत्साहात गणरायाची दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर घरोघरी तसेच विविध सार्वजनिक मंडळांच्या वतीने गणरायाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना करण्यात आली.





गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून शहरातील बाजारपेठेत गणेशमूर्ती, फुलांची सजावट, पूजेचे साहित्य, आकर्षक मखर, विद्युत रोषणाई तसेच विविध सजावटीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये गणेशोत्सवाचा उत्साह दिसून आला. गणरायाच्या आगमनाच्या दिवशी सकाळपासूनच घराघरांत मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशमूर्तीची विधिवत पूजा-अर्चा करून आरती करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळांनीही आकर्षक देखावे व विद्युत रोषणाई केली असून, पुढील काही दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**चिमुकल्यांमध्ये उत्साह....**

गणरायाच्या आगमनाचा सर्वाधिक आनंद चिमुकल्यांमध्ये पाहायला मिळाला. आपल्या लाडक्या बाप्पाला घरी आणण्यासाठी मुलांनी विशेष तयारी केली होती. गणेशमूर्तीची सजावट, आरती आणि बाप्पाच्या जयघोषात चिमुकले सहभागी झाले. अनेक ठिकाणी मुलांनी पारंपरिक वेशभूषेत मिरवणुकीत सहभाग घेतला.

**शेतकऱ्यांचे गणरायाकडे मोठ्या पावसासाठी साकडे......**

यंदाच्या पावसाळ्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने जाफराबाद तालुक्यातील शेतकरी चिंतेत आहेत. पावसाअभावी अनेक भागांत पिकांवर संकट निर्माण झाले असून, शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत. त्यामुळे गणरायाच्या चरणी शेतकऱ्यांनी मोठ्या पावसासाठी साकडे घातले आहे. 'गणराया, तालुक्यात दमदार पाऊस पडू दे, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळू दे आणि सर्वांच्या घरात सुख-समृद्धी नांदू दे,' अशी भावना व्यक्त करत शेतकरी व नागरिकांनी गणरायाची मनोभावे प्रार्थना केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहरासह ग्रामीण भागात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, पुढील बारा दिवस 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने, भक्तिभावाने जाफराबाद तालुका दुमदुमणार आहे.

पान १ व ४ वरुन...

### २५ सप्टेंबरपासून....

विक्रेत्याकडून रासायनिक खताची खरेदी करावी लागणार आहे.

**मोबाईलवरूनच ॲप उपलब्ध**

'' '' हे ॲप वरून डाउनलोड करून शेतकरी आगाऊ नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. २५ सप्टेंबरपासून खत खरेदी करताना प्रणालीचा वापर करावा लागणार असल्याने शेतकऱ्यांनी अंतिम तारखेची वाट न पाहता ॲप डाउनलोड करून आवश्यक माहिती पूर्ण करून ठेवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

प्रतिनिधीमार्फत खत घेताना आधार आवश्यक
शेतकऱ्याच्या वतीने दुसरी व्यक्ती खत घेण्यासाठी जाणार असल्यास त्या प्रतिनिधीचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार आहे. प्रतिनिधीकडे स्वतःचे आधार कार्ड तसेच संबंधित शेतकऱ्याचा क्यू आर कोड असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी?
एफएफएस ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड करून आगाऊ नोंदणी पूर्ण करावी.
फार्मर आयडी उपलब्ध असल्यास त्याचा वापर करावा.
आधार क्रमांकाशी मोबाईल क्रमांक लिंक असल्याची खात्री करावी.
जमीन व पिकाची माहिती अचूक भरावी.
ॲपमध्ये उपलब्ध जी एफ आर नुसार खताची आवश्यकता तपासावी. खत विक्रेता निवडल्यानंतर प्राप्त क्यू आर कोड व टोकन नंबर जतन करून ठेवावा.
प्रतिनिधीमार्फत खत खरेदी करणार असल्यास त्याचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक तयार ठेवावा.
२५ सप्टेंबर २०२६ पासून खत खरेदीसाठी एफएफएस प्रणालीचा वापर करावा. आगाऊ बुकिंगमुळे वेळ वाचणार
एफएफएस प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खतासाठी कृषी सेवा केंद्रांवर अनावश्यक गर्दी व लांब रांगा टाळता येणार आहेत. जवळच्या विक्रेत्याकडील उपलब्धतेनुसार खताची निवड करता येणार असल्याने वेळेची बचत होण्याबरोबरच खत खरेदीची प्रक्रिया अधिक नियोजनबद्ध होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल प्रक्रियेमुळे अनुदानित खताच्या विक्रीमध्ये पारदर्शकता वाढण्यासही मदत होणार आहे. तालुकानिहाय हेल्प डेस्क
एफएफएस प्रणाली वापरताना शेतकऱ्यांना अडचणी आल्यास तालुकास्तरावर कृषी विभागाच्या गुण नियंत्रण निरीक्षकांशी संपर्क साधता येणार आहे.
तालुका तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील गुण नियंत्रण निरीक्षक पंचायत समिती कार्यालयातील गुण नियंत्रण निरीक्षक
जालना रवी राठोड ९२२६६७०९२७ प्रदीप कदम ९४२१९४२३८८ बदनापूर श्रीकांत इंगळे ७८८७६८८४६६ श्रीनिवास सरकटे ९४२३१०४५६१ भोकरदन धनंजय सोनवणे ९४२०१४६३७९ अंकुश मस्के ९१३०४०७६४७
जाफराबाद श्रीमती कस्तुरे ७५८८१५५९४३
अंकुश मस्के ९१३०४०७६४७
मंठा विजय सानप ७४४७८८१७७७ श्रीनिवास सरकटे ९४२३१०४५६१ परतूर प्रवीण आनंदराव ९८६०६०३१४१ राजेश तांगडे ९४२२२०८८२२
घनसावंगी प्रवीण गाडेकर ८८८८९३३३६५ डी. एस. काकडे ९७३०८३४७४९
अंबड गणेश वाघ ९७६२९५७४०५ डी. एस. काकडे ९७३०८३४७४९ व्यापक जनजागृतीचे आवाहन
जालना जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी एफएफएस प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करून खत खरेदीची प्रक्रिया सुलभ व नियोजनबद्ध करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी, जालना यांनी केले आहे. तसेच तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, खत विक्रेते, गुण नियंत्रण निरीक्षक, खत उत्पादक कंपन्यांचे जिल्हा प्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांनी आपापल्या कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांमध्ये एफएफएस प्रणालीबाबत व्यापक जनजागृती करून ॲप वापरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.
२५ सप्टेंबरपासून डिजिटल खत खरेदीचा नवा टप्पा सुरू होणार असून, शेतकऱ्यांनी वेळेआधीच एफएफएस प्रणालीची तयारी करून ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### गणेश मंडळाच्या माध्यमातून...

कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे.
या कार्यक्रमांमध्ये स्थानिक क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ प्रत्यक्ष गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करतील. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांबाबत नागरिकांना थेट आणि अधिकृत माहिती उपलब्ध होणार आहे.

**कार्यक्रमांना व्यापक प्रसिद्धी**

शक्य असेल तेथे कार्यक्रमांचे फेसबुक किंवा युट्यूब लाईव्ह करण्यात येणार असून, सोशल मीडियावर गणेशोत्सव२०२६ आणि लोकसंवाद२०२६ हे हॅशटॅग वापरण्यात येणार आहेत. या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांपर्यंतही योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. ज्या गणेश मंडळांना या कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच मुंबई शहर व उपनगर गणेश मंडळानी माहिती व जनसंपर्क विभाग,मंत्रालय मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आले आहे.

### कलश शिष्यवृत्ती...

एग्रीकल्चर, बी.एस्सी. नर्सिंग, पॉलिटेक्निक आणि आयटीआय आदी १८ कोर्सेससाठी ही शिष्यवृत्ती योजना असून, फक्त अभ्यासक्रमाच्या या वर्षी प्रथम वर्षात प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी होता येणार आहे. दहावी किंवा बारावीची परीक्षा जालना जिल्ह्यातून उत्तीर्ण केलेले आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांच्या आत असलेल्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी जालना शहरातील व्यंकटेशनगरमधील जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात योजनेचे प्रकल्प समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित (मो. ९४०४६०७५७५) व दिलीप केंद्रे (मो. ७०२०५१८७६८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा अग्रवाल, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, सचिव सुरेश कुलकर्णी यांनी केले आहे.

### गौरी आगमनाच्या...

वस्तूंना पसंती दिली जात आहे. गणरायाच्या भक्तिमय वातावरणानंतर आता 'गौरी आली अंगणी'च्या उत्सवाची तयारी सुरू झाल्याने जालना शहरातील बाजारपेठेत सणाचा उत्साह अधिकच रंगतदार झाला आहे.

### नंदापूरच्या वैंभवात...

नागरिकांच्या सहज नजरेत हे मंदिर भरणार आहे. भव्य स्वरूपातील भारत माता मंदिरामुळे नंदापूरकडे येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधले जाणार असून, भविष्यात हे मंदिर गावाचे प्रमुख आकर्षण आणि एक वेगळी ओळख ठरण्याची शक्यता आहे.
भारत माता मंदिराच्या माध्यमातून केवळ धार्मिक भावना जोपासण्याबरोबरच देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय संस्कारांचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे या मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याकडे नंदापूरसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. ग्रामस्थांकडून उपस्थितीचे आवाहन लोकार्पण सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात विविध तयारी करण्यात येत असून, नंदापूर ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास नंदापूर तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, नंदापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. ''जय भारत माता की जय'' या जयघोषात होणारा हा लोकार्पण सोहळा नंदापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभक्तीच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

### शेतकऱ्यांवरील संकट...

जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने भक्ती निवास परिसर दुमदुमून गेला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक सलोखा, बळीराजाच्या सुख-समृद्धीची कामना आणि सर्वांच्या कल्याणाची भावना या सोहळ्यातून अधोरेखित झाली.

### नंदापूर येथे ...

यावेळी नंदापूरकर करीत आहे.
नंदापूरमध्ये गेल्या १३ वर्षांपासून सुरू असलेली ही धम्मपरंपरा केवळ धार्मिक उपक्रम न राहता समाजात समता, बंधुता, करुणा आणि विवेकाचे संस्कार रुजविण्याचे माध्यम ठरत आहे. या ग्रंथ पठणाचे वाचन दररोज सायंकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत होत असून यास गावातील उपासक - उपासिका यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. सदरील ग्रंथाचे वाचनाची समाप्ती येणाऱ्या ऑक्टोबर महीन्यातील अश्विन पौर्णिमा पर्यंत याचे पठण करण्यात येत असते. ग्रंथ समाप्तीनंतर उपासक-उपासिका यांच्यावतीने नंदापूर गावात मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. यावेळी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी होत असतात.

### कारची काचा...

असता एक मोटार सायकल वर दोन चोरट्यांनी कारचा पाठलाग करून कारची काच फोडून पैसे चोरून नेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी हे
१) गुंजी चालराजु जबराज २) गुड्डेटी विनोत प्रभुदास दोन्ही रा. कपरला टिपा. ता. बिटरगुंटा जि. नेल्लोर राज्य आंध्रप्रदेश येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, या आरोपीस अटक करणे कामी तपास पथक यांना आंध्र प्रदेश येथे रवाना करून आरोपी चा शोध घेतला असता मिळून आला नाही, परंतु त्याच्या राहत्या घरातून चोरीस गेलेले ६ लाख रुपये जप्त करण्यास तपास पथक यांना यश प्राप्त झाले आहे. बाकी आरोपी व उर्वरीत रक्कम यांचा शोध घेणे कामी पथक रवाना करण्यात आले आहेत. सदरची कारवाई मा. श्री. तेघबिर सिंह संधु साहेब, पोलीस अधीक्षक जालना,
मा. विक्रम साळी साहेब, अपर पोलीस अधीक्षक साहेब जालना, मा. अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, जालना यांचे मार्गदर्शनाखाली १) एम. टी. सुरवसे, पोलिस स्टेशन पोलीस ठाणे बदनापूर, २) पोउपनि एस. आर.कुकलारे, ३) पोहेकॉ/६७१ ए.एस.दासर,
४) पोको/२२७ भडंगे, ५) पोको/३४२ पी. के. गोलवाल, ६) पोको/१६९९ एस. जे. तडवी यांनी केली आहे.

# सहकारी बँका मार्फत पेट्रोल पंप चालवले जावेत - माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे

## जिल्हा मध्यवर्ती बँकेला ०५ कोटी ५९ लाख रुपये नफा; बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांची माहिती

**जालना - प्रतिनिधी**

: दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना यांची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष पाटील दानवे , बँकेच्या उपाध्यक्ष निर्मलाताई निर्मलाताई दीपक राव मरकड माजी अध्यक्ष सतीशराव टोपे यांच्यासह संचालक मंडळ विविका सोसायटीचे चेअरमन बँकेचे सभासद यांची उपस्थिती होती



यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने उंच भरारी घेण्यासाठी पेट्रोल पंप चालवण्यासारखे उपक्रम हाती घ्यावेत त्यासोबत बँकेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक मंडळाने एकत्रित येऊन काम करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले. पुढे पुढे श्री दानवे म्हणाले की, या बँकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी बँकांच्या धरतीवर आपल्याला काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी बँकेच्या संचालक मंडळाने एकत्रितपणे काम करून बँकेचा नावलौकिक वाढ व्हावा व नफा वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत शेतकऱ्यांची बँक म्हणून बँकेला नवा रुपाला आणण्यासाठी वेळ द्यावा लागेल असेही या वेळी ते म्हणाले पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, केंद्र सरकारने राज्यातील सोसायटीसाठी स्वतः ची इमारत व सोसायटीचे सक्षमीकरण करण्यासाठी पुढाकार घेतलेला असून, या माध्यमातून सोसायटी समृद्ध होतील ज्या माध्यमातून शेतकरी सभासदांना मोठा फायदा होईल अशी यावेळी त्यांनी सांगितले. पुढे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की , कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव सोसायट्यांचे सचिव यांनी या संस्थांना प्रगतीच्या दिशेने येण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगतानाच पुढे आमदार लोणीकरांनी सहकाराच्या माध्यमातून समृद्धीकडे जाण्यासाठी राज्य व केंद्र सरकार विशेष प्रयत्न करत असल्याची सांगितले

सभेत बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी बँकेचा वार्षिक अहवाल सभेसमोर मांडला. या अहवालातून बँकेच्या आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा, वाढलेला निव्वळ नफा, ठेवींमध्ये झालेली वाढ, शेतकरी सभासदांना करण्यात येणारे कर्जवितरण, विमा संरक्षण तसेच आधुनिक बँकिंग व सायबर सुरक्षा सुविधांची माहिती त्यांनी उपस्थित सभासदांना दिली.

निव्वळ नफा ५.५९ कोटींवर वार्षिक अहवाल सादर करताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की, सन २०२५ अखेर बँकेचा निव्वळ नफा २.०७ कोटी रुपये होता.

त्यात लक्षणीय वाढ होऊन सन २०२६ अखेर बँकेने ५.५९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला असल्याचे सांगितले वर्षांपासूनचा संचित तोटा मार्च २०२५ अखेर निरंक झाला असून, सन २०२६ अखेर बँककडे ५.५९ कोटी रुपयांचा संचित नफा असल्याचे त्यांनी सांगितले.

बँकेच्या ठेवींमध्येही वाढ झाली असून, सन २०२५ मधील ५८८.४८ कोटी रुपयांच्या ठेवी वाढून ६५५.६० कोटी झाल्या असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले. सभेतील विविध विषयांवर चर्चा होऊन उपस्थित सभासदांनी मांडलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

बँकेच्या आर्थिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत आगामी काळात शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांना अधिक सक्षम आर्थिक सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी माजी मंत्री रावसाहेब दानवे आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे आमदार संतोष दानवे पाटील अरविंद चव्हाण बँकेच्या उपाध्यक्ष निर्मलाताई दिपकराव मरकड, माजी अध्यक्ष सतीश राव टोपे शितलताई कुचे मनीषा ताई उडान, संदीप गोरे मनीषाताई गोरे शाळीग्राम मस्के भीमराव जावळे, भाऊसाहेब जाधव कल्याणराव खरात, जहीर भाई बँकेची एमडी श्री देशमुख डी डी आर श्री रोडगे श्री वरखडे श्री भुतेकर यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी बँकेचे सभासद सोसायटी यांची चेअरमन यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.





जालना शहरातील ओळखल्या जाणाऱ्या मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची स्थापना आरती माजी आमदार कैलास गोरंट्याल माजी नगराध्यक्ष सौ संगीता गोरंट्याल यांच्यासह अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते तर १६ तारखे सकाळ ची महाआरती माजी माजी नगराध्यक्ष खुशाल सिंग ठाकूर राणा व सुमेर सिंग ठाकूर यांच्या हस्ते तर सायंकाळची महाआरती नगरसेवक महावीर ढक्का यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचे सत्कार करताना गणपती ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड सोबत मंडळ समिती अध्यक्ष अल्केश अग्रवाल, महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, मयूर सावजी,रमेश दलाल,संजय तालुका,जितेश तालुका, अनुराग अग्रवाल, राहुल तालुका, सुनील अग्रवाल, श्रेणी आबड आदी ***(छाया/जावेद तंबोली)***

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन, तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दि. १७ सप्टेंबर २०२६ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमीत्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात होणार आहे.

तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, यांच्या हस्ते सकाळी ९.०० वाजता हुतात्मा स्मारक, टाऊन हॉल, जुना जालना येथे ध्वजारोहणाचा मुख्य समारंभ होणार आहे. तरी ध्वजारोहणाच्या समारंभासठी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोशाखात वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलनासाठी विशेष सर्वेक्षण मोहिमेच आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग संक्रमण हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्ह्यात कुष्ठरोगाच्या प्रतिबंध, लवकर निदान आणि उपचारासाठी विशेष सर्वेक्षण मोहीम दि. १६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मागील पाच वर्षांत निदान झालेल्या कुष्ठरुग्णांच्या कुटुंबीय व निकट संपर्कातील सहवासितांचे सर्वेक्षण ( ) तसेच () राबविण्यात येणार आहे. समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधणे, निदान झालेल्या रुग्णांच्या निकट संपर्कातील व्यक्तींची तपासणी करणे, विशेषतः बाल कुष्ठरोग, सांसर्गिक कुष्ठरोग ( ) तसेच श्रेणी १ (-) व श्रेणी २ (-) विकृती असलेल्या रुग्णांचे प्रमाण कमी करणे आणि संसर्गाची साखळी खंडित करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. उच्च जोखमीच्या भागांवर विशेष लक्ष अंतर्गत १४ वर्षा खालील कुष्ठरुग्ण आढळण्याची शक्यता असलेली क्षेत्रे, सांसर्गिक () कुष्ठरुग्णांच्या संपर्कातील सहवासित, मागील पाच वर्षांत कुष्ठरुग्ण आढळलेल्या कुटुंबांतील व्यक्ती, विकृती असलेल्या रुग्णांच्या संपर्कातील सहवासित तसेच कुष्ठरोगाचे प्रमाण जास्त असलेली गावे, पाडे आणि शहरी वॉर्ड यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

शहरी भागात निवडक क्षेत्रातील सुमारे २०० घरांचा तर ग्रामीण भागात लोकसंख्येनुसार संपूर्ण गाव अथवा संबंधित रुग्णाच्या परिसरातील सुमारे ३०० घरांचा घरभेटीद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मागील पाच वर्षांतील रुग्णांची यादी ( ) तयार करून त्यानुसार सर्वेक्षणाचे नियोजन करण्यात येणार आहे.

**संशयीत कुष्ठरुग्णांची तातडीने तपासणी व उपचार**

सर्वेक्षणादरम्यान त्वचेवरील बधीर चट्टे बाधित मज्जा, हात पायांच्या संवेदनांमध्ये घट आदी कुष्ठरोगाची लक्षणे असलेल्या संशयित व्यक्तींची पुढील तपासणी करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार संबंधित आरोग्य संस्थेकडे संदर्भित करून निदान व उपचाराची कार्यवाही केली जाणार आहे. तसेच पात्र सहवासितांना प्रतिबंधक औषधोपचार (), देण्यात आले आहे किंवा नाही. याची तपासणी केली जाणार असून, पात्र व्यक्तींना नियमानुसार प्रतिबंधक उपचार देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**आरोग्य विभागाच्या पथकांमार्फत अंमलबजावणी**

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची राहणार आहे. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम () अंतर्गत कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच आवश्यकतेनुसार इतर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे, हा उपक्रम नियमित आरोग्य विभागीय कार्याचा भाग म्हणून राबविण्यात येणार आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर तपासलेल्या घरांची व व्यक्तींची संख्या संशयित व निदान झालेले नवीन रुग्ण, बाल कुष्ठरुग्ण, सांसर्गिक कुष्ठरुग्ण, विकृती असलेले रुग्ण तसेच प्रतिबंधक औषधोपचार देण्यात आलेल्या सहवासितांची संख्या यांचा समावेश असलेला अहवाल तयार करण्यात येणार आहे.

# जालना जिल्ह्यातील पिकांच्या परिस्थितीचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर

**जालना - प्रतिनिधी**

: खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून जिल्ह्यात झालेला एकूण पाऊस हा या कालावधीतील सरासरी पर्जन्यमानाच्या केवळ ८१.० टक्के झाला आहे. ऑगस्ट महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून, सप्टेंबरमध्ये १४ तारखेपर्यंत सरासरीच्या केवळ ३३.१ टक्के पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या परिस्थितीची संयुक्त पाहणी करून जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक ११ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीत खरीप हंगामातील पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या पिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी संयुक्त पीक पाहणी समित्यांची स्थापना करण्यात आली. या समित्यांमध्ये उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व विषयतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या संयुक्त समित्यांनी संबंधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटी करून विविध पिकांची सद्यःस्थिती, पावसातील खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, पिकांची वाढ व उत्पादनाची संभाव्य स्थिती आदी बाबींची पाहणी केली. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या संयुक्त पीक पाहणी समित्यांनी आपले अहवाल सादर केले असून, त्याआधारे जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

शासन स्तरावर सदर अहवालाची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत. पिकांची सद्यः स्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिकांची अवस्था आणि स्थानिक पर्जन्यमानाचा विचार करून कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

तसेच पीकविषयक कोणताही निर्णय घेताना कृषी विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून व तज्ज्ञांकडून प्राप्त होणाऱ्या सल्ल्याचा अवलंब करावा. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन आवश्यक त्या उपाययोजना करीत असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्ती यांनी सांगितले आहे.

# गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत पोलिसांना तपासाचा अधिकार नाहीः सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना - प्रतिनिधी**

गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४ अंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये पोलिसांना थेट प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवून स्वतंत्र तपास करण्याचा अधिकार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. फौजदारी अपील क्रमांक २९३८/२०२५ (उत्तर प्रदेश शासन विरुद्ध ब्रिजपाल सिंग व इतर - २०२६ आयएनएससी ९०१) या खटल्याचा निकाल देताना न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने हा स्पष्ट निर्वाळा दिला. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, या विशेष कायद्याच्या कलम १७(४) अन्वये तक्रारींची चौकशी व तपास करण्याचे अधिकार केवळ सक्षम प्राधिकरणाकडे (अप्राप्रिएट अथॉरिटी) सोपवण्यात आले आहेत. जरी कलम २७ अन्वये हे गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असले, तरी कलम २८ नुसार केवळ सक्षम प्राधिकरणाने दाखल केलेल्या तक्रारीवरच न्यायालय दखल घेऊ शकते. त्यामुळे पोलीस केवळ गुन्ह्याचा तपास करून आरोपपत्र दाखल करू शकत नाहीत आणि अशा आरोपपत्रावर न्यायालयास थेट दखलही घेता येत नाही. सक्षम प्राधिकरणाने मागणी केल्यास पोलीस त्यांना केवळ पूरक मदत करू शकतात. मात्र, त्याच घटनेत भारतीय दंड संहिता अथवा भारतीय न्याय संहितेअंतर्गत स्वतंत्र फौजदारी गुन्हा घडला असल्यास, त्या भागाचा तपास करण्याचे पोलिसांचे अधिकार अबाधित राहतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालाचे स्वागत करताना जालना येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. महेश धनावत यांनी प्रतिक्रिया दिली की, सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे देशभरातील विविध उच्च न्यायालयांच्या परस्परविरोधी निर्णयांमधील संभ्रम कायमचा दूर झाला आहे. हा वैद्यकीय आणि तांत्रिक स्वरूपाचा कायदा असल्याने डॉक्टरांवर निष्कारण होणारी कारवाई रोखण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तपास यंत्रणा अत्यंत महत्त्वाची ठरते. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल न्यायव्यवस्थेच्या कार्यपद्धतीला अधिक स्पष्टता आणि पारदर्शकता देणारा ठरला आहे.

# सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबविण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर सेवा संकल्प अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे योग्य नियोजन करून ते प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

या अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय ऑनलाईन आढावा बैठकीत श्रीमती मित्तल या बोलत होत्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी (महसुल) मनीषा दांडगे यांच्यासह ऑनलाईन जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, जालना महानगर पालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, सर्व उपविभागीय अधिकारी, संबंधीत विभाग प्रमुख यांची उपस्थित होती. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सांगितले की, या महिनाभराच्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर सेवा सेतू शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करावे.

# स्वाधार योजना, शासकीय वसतिगृह प्रवेशात बनावट कागदपत्रे आढळल्यास कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना तसेच शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्याच्या उद्देशाने काही विद्यार्थी खोटी, बनावट अथवा फेरफार केलेली कागदपत्रे सादर करीत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अर्जांची आणि प्रकरणांची सखोल तपासणी करण्यात येणार असून, कागदपत्रे बनावट अथवा खोटी आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी बनावट भाडेकरारनामा, खोटे बोनाफाईड प्रमाणपत्र, बनावट वसतिगृह प्रमाणपत्र, खोटी उपस्थिती, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र किंवा इतर आवश्यक कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज अथवा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याने यापूर्वी स्वाधार योजनेचा किंवा शासकीय वसतिगृहाचा लाभ घेतला असल्यास तो लाभ नियमानुसार रद्द करून शासनाकडून अदा करण्यात आलेली रक्कम वसूल केली जाणार आहे. प्रकरणाच्या स्वरूपानुसार संबंधितांविरुद्ध लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाईही करण्यात येईल. स्वाधार योजना किंवा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरताना इंटरनेट कॅफे अथवा ऑनलाइन सेवा केंद्र चालकांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, कागदपत्रांमध्ये फेरफार करणे, खोटी माहिती अपलोड करणे, बनावट प्रमाणपत्रे तयार करून देणे किंवा विद्यार्थ्यांना शासनाची फसवणूक करण्यास जाणीवपूर्वक मदत करणे आढळल्यास संबंधित कॅफे चालक, मालक किंवा व्यक्तीविरुद्धही नियमानुसार कठोर कायदेशीर आणि फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय अशा गैरप्रकारात कोणतीही व्यक्ती, संस्था, महाविद्यालयीन अधिकारी किंवा कर्मचारी अथवा इतर संबंधित व्यक्ती सहभागी असल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्यास, त्यांच्या भूमिकेनुसार संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# नागरिकांनी स्वच्छता ही सेवा उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा - सीईओ डॉ कृष्ण कांत कनवारिया

**जालना - प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२६ पंधरवडा दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत *स्वच्छते मध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत* या थीमखाली साजरा करण्यात येत असून या अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी विभाग प्रमुखांच्या बैठकीत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक सुशील कुमार पठारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, प्रकल्प संचालक लिंबाजी बारगीरे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती. केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये राबविला जात आसुन. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच विविध विभागांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, तसेच या पंधरवड्या दरम्यान प्रमुख उपक्रमांतर्गत अस्वच्छ ठिकाणांची निवड



करून साफसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सुरक्षा शिबिरे, पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव, स्वच्छ सुजल गाव संकल्पनेशी निगडित प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी ''एक दिवस एक तास एक सोबत'' या संकल्पनेतून देशव्यापी श्रमदान आयोजित करण्यात आले आहे. या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या गावात सामूहिक श्रमदान करून स्वच्छता मोहिमेला हातभार लावावा, तसेच जिल्हाभरात जास्तीचा पाऊस झाला असल्यामुळे गावातील नाल्या द्वारे पाणी गावात साचले असून गावातील नाल्या वाहत्या करणे तसेच पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत करण्याबाबतही आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी जिल्हा परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या प्रमुखांच्या बैठकीत केले आहे.

**स्वच्छता ही सेवा पंधरवडा म्हणजे केवळ मोहिम नसून हा सामूहिक कृतीचा उत्सव आहे. १७ सप्टेंबर रोजी गावागावात प्रभात फेरी व सेवा ज्योत या उपक्रमाचे आयोजन केले असून जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या सहभागातूनच जालना जिल्हा स्वच्छ, निरोगी व सुजल बनविण्याचे ध्येय साध्य होईल.**

**डॉ कृष्ण कांत कनवारिया**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना**





चंद्र शुक्र युती ही एक अत्यंत दुर्मिळ खगोलीय घटना काल १४ सप्टेंबर २०२६ रोजी होती ज्याला खगोलशास्त्रात लोणार थांब थांब लूनर ऑकल्टेशन म्हटले जाते या घटनेचा सुवर्णक्षण संध्याकाळी साडेसहा ते सव्वा सात वाजेपर्यंत खगोल प्रेमींनी अनुभवला चंद्राच्या मागे लपलेला शुक्र ग्रह जणू काही लपंडाव खेळत आहे असे भासत होते.

*छायाचित्र किरण खानापुरे*

### आ. बबनराव लोणीकर यांच्या निवासस्थानी गणरायाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना

## शेतकऱ्यांवरील संकट दूर होऊन राज्यात समाधानकारक पाऊस पडावा; बाप्पाच्या चरणी साकडे

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या भक्ती निवासस्थानी श्री गणरायाचे भक्तिभावाने आणि मंगलमय वातावरणात आगमन झाले. मान्यवरांच्या उपस्थितीत विधिवत पूजा-अर्चा करून श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.



गणरायाच्या आगमनाने भक्ती निवास परिसरात भक्तिमय आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले. यावेळी श्री विघ्नहर्त्याच्या चरणी विविध सामाजिक आणि जनहिताच्या प्रार्थना करण्यात आल्या. राज्यातील शेतकरी बांधवांवरील संकटे दूर व्हावीत, सर्वदूर समाधानकारक पाऊस पडावा आणि पावसाअभावी अडचणीत आलेल्या खरीप पिकांना नवसंजीवनी मिळावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असलेल्या बळीराजाला यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीतून दिलासा मिळावा, शेतशिवार पुन्हा हिरवाईने फुलून यावे आणि शेतकरी सुखी, समृद्ध व समाधानी व्हावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच राज्यातील प्रत्येक कुटुंबाच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि समाधान नांदावे, महाराष्ट्रावर विघ्नहर्त्याची कृपादृष्टी राहावी, अशी प्रार्थना करण्यात आली. या भक्तिमय प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर, वंदनाताई लोणीकर, श्रीजय लोणीकर, विक्रम उफाड, विलास घोडके, कौशल पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणरायाच्या (पान २ वर)

# कारची काचा फोडून चोरलेले सहा लाख रुपये केले जप्त

### बदनापूर पोलिसांची कारवाई

**बदनापुर - प्रतिनिधी**

बदनापूर शहरातील बँकेतून दिनांक ०४/०९/२०२६ रोजी फिर्यादी - नामे विष्णु कुंडलीकराव कोल्हे रा. धोपटेश्वर ता. बदनापूर जि. जालना यांनी १० लाख रुपये काढून आपल्या कारमध्ये घेऊन जात असताना त्यावर चोरट्यांनी पाळत ठेवून फिर्यादीच्या कारचा पाठलाग करून धोपटेश्वर शिवरातील धोपटेश्वर ते देवगाव रोडवर आपली कार उभी करून शेतात जाऊन परत आले असता कारच्या मागील दरवाजाचे काच तुटलेले दिसले



असता गाडीतील रक्कम दिसेनाशी झाली. त्यानंतर फिर्यादी विष्णु कुंडलीकराव कोल्हे वय ४९ वर्ष रा. धोपटेश्वर ता. बदनापूर जि. जालना हे पोलिस स्टेशन बदनापूर येथे येऊन रिपोर्ट दिल्यावरून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. एम. टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक बदनापूर यांनी तत्काळ सूत्र हाती घेऊन २ टीम तयार करून गुन्ह्याच्या तपासामध्ये फुटेज चेक केले तसेच तांत्रिक तपास केला (पान २ वर)

# नंदापूर येथे 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचे अखंड पठण

### गुरुपौर्णिमेपासून - अशविनी पौर्णिमा या तीन महिने पठण; मनीषा खरात यांचा एकही दिवस खंड नाही

**नंदापूर - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील नंदापूर येथील जेतवन बुद्ध विहारात गुरुपौर्णिमेपासून 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे नियमित पठण सुरू असून, सलग तीन महिन्यांपासून या ग्रंथाचे वाचन अखंडपणे सुरू आहे. विशेष म्हणजे, मनीषा शिवाजी खरात यांनी या तीन महिन्यांच्या कालावधीत एकही दिवस खंड न पडू देता सातत्याने ग्रंथाचे पठण करीत राहतात.

नंदापूर गावात 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या पठणाचे हे १३ वे वर्ष आहे. गेल्या बारा वर्षांपासून सुरू असलेली ही धम्म परंपरा यंदाही मोठ्या श्रद्धेने आणि सातत्याने पुढे नेण्यात येत आहे. जुलै महीन्यातील (दि.२९) गुरुपौर्णिमेपासून सुरू झालेले ग्रंथपठण



सलग तीन महीने महिन्यांच्या कालावधीत नियमितपणे करण्यात येत असून, भगवान गौतम बुद्धांचे विचार, त्यांचा धम्म, मानवतावादी दृष्टिकोन आणि समतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. जेतवन बुद्ध विहारात होणाऱ्या या ग्रंथपठणामुळे परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले आहे. उपासक-उपासिका श्रद्धेने ग्रंथाचे पठण व श्रवण करीत असून, बुद्धांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्पही व्यक्त केला जात आहे.

मनीषा शिवाजी खरात यांनी सलग दीड महिन्यापासून एक दिवस खंड पाडता या ग्रंथाचे पठण करीत असून यापुढेही सतत पठण करून येणाऱ्या ऑक्टोबर २०२६ मधील अश्विन पौर्णिमेपर्यंत सदरील ग्रंथाचे वाचक करणार आहे.

तीन महिने एकही दिवस खंड न पडू देता ग्रंथाचे पठण करून या धम्मपरंपरेत सातत्याचे उदाहरण निर्माण केले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे उपासक-उपासिकांकडून कौतुक होत आहे. नंदापूर येथील उपासक-उपासिकांनी ही ग्रंथपठणाची परंपरा भविष्यातही अखंडितपणे सुरू ठेवण्याचा संकल्प केला आहे. कोणताही खंड न पडता दरवर्षी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन सुरू ठेवून बुद्धांच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार (पान २ वर)

# प्रथमाचार्य शांतिसागरजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव साजरा

**जालना – प्रतिनिधी**

दिगंबर जैन समाजाच्या आध्यात्मिक परंपरेतील चरित्रचक्रवर्ती प्रथमाचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज यांचा ७१ वा पुण्यतिथी महोत्सव रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी रुक्मिणी गार्डनमध्ये प. पू. वात्सल्यमूर्ती आचार्य पवित्रसागर महाराज, प. पू. मुनी प्रशांतसागर महाराज व प. पू. मुनी प्रभावसागर महाराज यांच्या ससंघ सान्निध्यात आणि अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.

आचार्य श्री पवित्रसागरजी महाराज तसेच मुनिश्री प्रशांतसागरजी महाराज व मुनिश्री प्रभावसागरजी महाराज





यांनी प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज यांनी शांतीसागरजी महाराज यांच्या कठोर तपश्चर्या, त्याग, संयम, चारित्र्य, अहिंसा आणि आत्मसाधनेचे स्मरण करून त्यांच्या आदर्श जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले तर दिलीप घेवारे यांनी आचार्य शांतिसागर महाराजांच्या त्याग, तपश्चर्या व संयममय जीवनाचे स्मरण करून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. आचार्य श्री शांतिसागरजी महाराजांनी दिगंबर जैन साधू परंपरेच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी केलेले कार्य, देशभर केलेला पायी विहार आणि आपल्या कठोर साधनेतून समाजाला दिलेली धर्मप्रेरणा याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या पवित्र जीवनकार्यामुळे आजही असंख्य श्रावक-श्राविकांना धर्ममार्गाची प्रेरणा मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पुण्यतिथी महोत्सवानिमित्त मंदिरात अभिषेक, भव्य मिरवणूक, समाधी दिवस महोत्सव, मुनिसंघाचे आशीर्वचन आणि वात्सल्य भोजन आदी कार्यक्रम पार पडले. समाजबांधवांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवून श्री शांतिसागरजी महाराज यांच्या चरणी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राहुल पालंबे, पवन आंबूरे, महावीर लव्हाडे, अजित छाबडा, संजय लव्हाडे, दीपक जैन, गणेश काळे, धनराज जैन, अमोल मोगले, निलेश सावळकर, दिलीप काळजाते, सुरेश अग्रवाल, राहुल काळे, महावीर काळे, चंद्रकांत गुंगे, पारस काळे यांच्यासह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव मेहेत्रे यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पार्श्व पवित्र सेवा समिती, आणि सकल जैन समाजाने विशेष परिश्रम घेतले.

## मनोज जरांगे यांना रुग्णालयात दाखल होण्याचा व प्रवास टाळण्याचा जिल्हा आरोग्य यंत्रणेचा सल्ला

**जालना - प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची आज सकाळी साडेअकराच्या सुमारास जिल्हा वैद्यकीय यंत्रणेकडून तपासणी करण्यात आली. उपोषणामुळे प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा तसेच प्रवास टाळण्याचा सल्ला वैद्यकीय पथकाने दिला होता. मात्र श्री. जरांगे पाटील यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिली नाही, अशी माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली. श्री. जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसले होते. त्यांच्या प्रकृतीच्या निगराणीसाठी चोवीस तास तज्ञ डॉक्टरांचे वैद्यकीय पथक कार्यरत होते. त्यांच्या प्रकृतीची जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाकडून नियमित तपासणी करण्यात येत होती.

दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.१० वाजता केलेल्या तपासणीमध्ये श्री. जरांगे पाटील शुद्धीत व प्रतिसाद देण्याच्या स्थितीत होते. तथापि, त्यांना थकवा जाणवत होता व जीभ कोरडी असल्याचे आढळून आले. त्यांनी लघवीचा नमुना दिलेला नाही. तसेच शिरेद्वारे द्रवपदार्थ घेण्यास नकार दिला, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी अहवालाद्वारे दिली.

यापूर्वी दि. १४ सप्टेंबर रोजी रात्री ९.४० वाजता केलेल्या तपासणी करण्यात आली. तसेच दि. १५ सप्टेंबर रोजी पहाटे १.३० आणि सकाळी ७.०५ वाजता त्यांनी वैद्यकीय तपासणीस नकार दिला. श्री.जरांगे यांनी तपासणी व उपचार घ्यावे, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून वेळोवेळी विनंती करण्यात आली. तसेच त्यांच्याशी वारंवार संवाद साधून तपासणी व उपचार करून घेण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करण्यात आले. मात्र, त्यांनी उपचार घेण्यास व रुग्णालयात दाखल होण्यास नकार दिला.

सध्याची प्रकृती पाहता प्रवास करणे योग्य नसल्याचा सल्लाही श्री. जरांगे यांना देण्यात आला आहे. त्यांना प्रकृतीच्या संभाव्य धोक्यांची माहिती देऊनही श्री. जरांगे पाटील यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिलेली नसल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.